पुढारी



नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे आयोजित कॅम्पस प्लेसमेंटमध्ये निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी अजिंक्य वाघ व प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर.

# के. के. वाघच्या ११६ विद्यार्थी, पालकांचा सत्कार

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित कॅम्पस प्लेसमेंटमध्ये निवड झालेल्या ११६ विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने नुकताच औरंगाबाद सभागृह येथे विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा सत्कार सोहळा पार पडला. संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ व प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थी व पालक यांना गौरविण्यात आले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपये आणि सर्वाधिक १० लाख रुपयांचे वार्षिक वेतनाची ऑफर मिळालेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये २०० हून अधिक नामांकित उद्योगसमूहांनी के. के. वाघ महाविद्यालयात कॅम्पस मुलाखती घेतल्या असून, आतापर्यंत ५५० हून अधिक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने फिनिक्यू, जोश सॉफ्टवेअर, इन्फोसिस, सुलझर, टेक महिंद्रा, अदानी ग्रुप, टीसीएस, क्रॉम्प्टन ग्रीव्हज आणि इमर्सन यांसारख्या नामांकित कंपन्यांचा समावेश असल्याची माहिती ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक होत असून, पालक आणि शिक्षकांमधील परस्पर आदर अधिक दृढ होत असल्याचे मत संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ आणि सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
Jun 01, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com